आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ मे २०२४ - शुक्रवार

ठाणे जिल्ह्यात डोंबिवली इथल्या औद्योगिक वसाहतीतल्या एका कंपनीत काल झालेल्या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ९ वर पोहोचली आहे. या स्फोटात ६४ पेक्षा जास्त जण जखमी झाले. कंपनीचे संचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला पाच लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. जखमींच्या उपचाराचा खर्च राज्यसरकार उचलणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

पुण्यामध्ये खडकवासला इथल्या एनडीए, अर्थात राष्टीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४६ व्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा आज पार पडला. लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी संचलनाचं निरीक्षण केलं.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४६ व्या अभ्यासक्रमाचा दीक्षांत समारंभ काल हबीबुल्लाह सभागृहात पार पडला. हिमाचल प्रदेश केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सतप्रकाश बन्सल, या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. एकूण २०५ कॅडेट्सना यावेळी पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १७ परदेशी कॅडेट्सचा समावेश होता.

<><><><><>

पुण्याच्या एफटीआयआय, अर्थात भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या चिदानंद नाईक या विद्यार्थ्यानं दिग्दर्शित केलेल्या ‘सनफ्लावर्स वर

द फर्स्ट वन्स टू नो’ (Sunflowers Were The First Ones To Know) या लघुपटाला ७७व्या कान चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट लघुपटाचा ‘ल सिनेफ’ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या चित्रपटाचं कथानक कर्नाटकातल्या लोककथेवर आधारित आहे. याचं चित्रीकरण सूरज ठाकुर, संकलन मनोज व्ही. आणि ध्वनिसंयोजन अभिषेक कदम यांनी केलं आहे.

जगभरातल्या ५५५ चित्रपट प्रशिक्षण संस्थांमधून आलेल्या २ हजार २६३ लघुपटांमधून निवड झालेले १८ चित्रपट या पुरस्काराच्या स्पर्धेत होते.

-<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्याच्या मतदानासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८ मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे.

यात उत्तर प्रदेशातल्या १४, हरियाणा १०, बिहार आणि पश्चिम बंगाल प्रत्येकी ८, दिल्ली ७, ओडिशा ६, झारखंड ४ आणि जम्मू-काश्मीरमधल्या एका जागेचा समावेश आहे. एकंदर ८८९ उमेदवार या सहाव्या टप्प्यात निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतदान उद्या सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत होईल.

<><><><><>

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल छत्रपती संभाजी नगरात मराठवाड्यातल्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीत त्यांनी

मराठवाड्यातल्या दुष्काळी स्थिती बरोबरच विविध उपाययोजनांची माहिती घेतली. या वेळी जिल्हाधिकाऱ्यांबरोबर पालक मंत्रीही उपस्थित होते. मराठवाड्यातल्या १ हजार २५० गावांसाठी १ हजार ८३७ टँकरची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

<><><><><>

प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियाना अंतर्गत धुळे जिल्ह्यातल्या माहेश्वरी महिला संघटनेनं 'निक्षय मित्र' होऊन, सामाजिक बांधिलकीतून धुळे शहरातल्या उपचाराधीन १०० क्षयरुग्णांना पोषक आहार देण्याच्या उद्देशानं १ वर्ष दत्तक घेतलं आहे. शहरातल्या दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी क्षय रुग्णांना दत्तक घेऊन या राष्ट्रीय कार्याला हातभार लावावा असं आवाहन धुळे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी केलं आहे.

<><><><><>

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ तलावांमध्ये सध्या केवळ १० पूर्णांक ६७ शतांश टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. हवेतल्या वाढत्या उष्म्यामुळे तलावांमधल्या पाण्याचं वेगानं बाष्पीभवन होत आहे. मान्सूनचं आगमन लांबलं तर मुंबईवर पाणी टंचाईचं सावट राहील असा अंदाज आहे.

<><><><><>

भारतीय बॅडमिंटन पटू आणि दोनवेळा ऑलंपिक पदक विजेती पी. व्ही. सिंधुनं मलेशियन मास्टर्स च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. आज

सकाळी कौलांलपूर इथं आज सकाळी झालेल्या सामन्यात तिनं चीनच्या हान हुई चा २१-१३,१४-२१,२१-२२ असा पराभव केला.

महिला एकेरीच्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात मात्र भारताच्या अश्मिता चलिहा हिला चीनच्या झांग यी मान हिच्याकडून १०-२१, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या वेंगुर्ला बंदरात काल रात्री एक नौका  उलटून झालेल्या अपघातात दोन नावाड्यांचा बुडून मृत्यू झाला. नौकेत एकूण सात नावाडी होते. यापैकी तीन जण पोहत किनाऱ्यावर आले, दोन जण अद्याप बेपत्ता असून, त्यांचा शोध सुरु असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जाहीर झाला आहे. मुंबईच्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीनं दरवर्षी १४ जूनला गो. ब. देवल पुरस्कार समारंभाचं आयोजन करण्यात येतं. परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. दरवर्षी नाट्य क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या नाट्यकर्मींचा सन्मान नाट्य परिषदेच्या वतीनं केला जातो. यानिमित्तानं कलावंतांचा मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. तसंच १०० व्या नाट्यसंमेलनानिमित्त घेण्यात आलेला 'नाट्यकलेचा

जागर' यातील सर्वोत्कृष्ट पारितोषिक प्राप्त एकांकिका, बालनाट्य, एकपात्री, नाट्यछटा, नाट्यसंगीत पद गायन, नाट्य अभिवाचन कार्यक्रम यानिमित्तानं सादर होणार असल्याचं दामले यांनी सांगितलं.

//<><><><><><>//